# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## पुनर्मुल्यांकन विभाग


कॉम्पलेक्स परिसर,**एम.आय**.डी.सी. रोड, **गडचिरोली–४४२६०५**

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: **०७१३२–२२३३२०**
ईमेल : *coegondwana@gmail.com*


जा. क्र.परीक्षा वि./पुनर्मुल्याकन वि./ ६९२/२०२३ दिनांक : २९/०५/२०२३

# परिपत्रक

## Revaluation of Answer book for Summer-2023 Examination

गोंडवाना विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, उन्हाळी–२०२३ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची **Photo Copy / Xerox Copy, Chanllenge of Valuation** तसेच **Retotalling of Paper** यासाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली चे अध्यादेश क्रं. ९६/२०१७, नुसार खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

1. **Procedure of Xerox copy (Photo copy) Application.**

उन्हीळी २०२३ च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची **Photo Copy / Xerox Copy,** पाहिजे असल्यास सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून **Appendix-A** हा **Online Form** व रूपये ३००/– प्रति पेपर शुल्कासह भरावे **(फक्त दोन विषय प्रती परीक्षा)** आणि महाविद्यालयांनी सदर आवेदन पत्र विद्यापीठामध्ये शुल्कासह विहीत मुदतीत सादर करावे.

2. **Procedure For Challenge to Valuation.**

उन्हाळी २०२३ च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे **Challenge to Valuation** करावयाचे असल्यास त्या विद्यार्थ्याने त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून **Appendix-B** हा **Online Form** भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये पुनर्मुल्यांकनासाठी रूपये ५००/– प्रति पेपर शुल्क भरावे आणि महाविद्यालयानी विद्यार्थ्यांचे फार्म विद्यापीठामध्ये जमा करावे **(फक्त दोन विषय प्रती परिक्षा)**. या पध्दतीने विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे फक्त पुनर्मुल्यांकन **(Revaluation)** करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3. **Procedure For Retotalling of Papers.**

तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे **Retotalling** करावयाचे असल्यास त्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून **Appendix-C** हा **Online Form** भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये रूपये १००/– प्रती पेपर शुल्क भरावे. त्यानंतर महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. (विद्यार्थ्यांना **Retotalling** सर्व विषयाचे सुध्दा करता येईल.) **तसेच** महाविद्यालयाने सदर शुल्क NEFT/RTGS पध्दतीने बँक ऑफ इंडिया शाखा, **गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** मधिल विद्यापीठाचे खाते **क्र.९६४८१०२१००००००२२** (IFSC Code BKID०००९६४८) मध्ये रक्कम जमा करावे.

ज्या अभ्यासक्रमाचे निकाल घोषीत होतील त्या तारखेपासून वरील प्रक्रियेकरीता १० दिवस देण्यात येईल. त्यानंतर सर्व आवेदन पत्र महाविद्यालयांने २ दिवसाच्या आत विद्यापीठात जमा करावे.

**सहपत्र :**

1) Appendix-A
2) Appendix-B
3) Appendix-C

टिप: आवेदन पत्रासह विद्यार्थ्याचा ABC user Id नमुद करणे आवशक आहे. त्याशिवाय पुनर्मुल्यांकन आवेदन पत्र स्विकारल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

29.5.2023

**संचालक,**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली